# शिव

## (शास्त्रीय विवेचन आणि उपासना)

मराठी (Marathi)

**संकलक**

हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**पू. संदीप गजानन आळशी**

**सनातन संस्था**

प्रस्तुत पुनर्मुद्रणाच्या ५,००० प्रती

आणि आतापर्यंत १,९४,२०० प्रती प्रकाशित !

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय

१. ‘संमोहन उपचारतज्ज्ञ’ म्हणून मुंबईत व्यवसाय (वर्ष १९७८ ते १९९४)

२. अध्यात्माच्या प्रसारासाठी ‘सनातन संस्थे’ची स्थापना

३. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) (टीप) स्थापनेचा उद्घोष आणि कार्यारंभ (वर्ष १९९८)

(टीप : हिंदु राष्ट्र [ईश्वरी राज्य] – ‘हीनान् गुणान् दूषयति इति हिंदुः ।’ म्हणजे ‘कनिष्ठ, हीन, अशा रज आणि तम गुणांचा नाश करणारे ते हिंदू.’ अशा सात्त्विक लोकांचे राष्ट्र म्हणजे ‘हिंदु राष्ट्र’ होय.)

४. गुरुकुलासम सनातन आश्रमांची निर्मिती !

५. ईश्वरप्राप्तीसाठी, तसेच राष्ट्र आणि धर्म यांच्या कार्यासाठी तन–मन–धन यांचा त्याग करणारे सहस्रो साधक घडवणे

६. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : यानुसार साधना करून २५.३.२०२३ पर्यंत १२३ साधक संत झाले, तर १,०८७ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू !

७. देवता, साधना, आचारपालन आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती : मार्च २०२३ पर्यंत ३६० ग्रंथांच्या १७ भाषांत ९३ लाख प्रती आणि ५,००० हून अधिक ग्रंथ होतील एवढे लिखाण प्रकाशित होण्याच्या प्रतीक्षेत !

८. साधना आणि हिंदु धर्म शिकवणाऱ्या ध्वनी-चकत्या (ऑडिओ सीडी) अन् ध्वनीचित्र-चकत्या (व्हिडिओ सीडी) यांची निर्मिती

९. शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

१०. स्वतःचा देह (नखे, केस आणि त्वचा), तसेच वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधनकार्य अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

११. कलेचे सात्त्विक सादरीकरण होण्यासाठी संशोधन

१२. २५.३.२०२३ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २३४ अन् अन्य ९१९ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

१३. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

१४. ज्योतिषशास्त्र अन् नाडीभविष्य यांच्याद्वारे विविधांगी संशोधन

१५. ‘सनातन प्रभात’च्या माध्यमातून पत्रकारितेचे कार्य

१६. धर्माधिष्ठित हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी, देशभक्त आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे संघटन अन् त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन

१७. भीषण आपत्काळाचा विचार द्रष्टेपणाने अनेक वर्षे आधीच करून आपत्काळात जीवितरक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या विविध उपाययोजनांविषयी ग्रंथ, नियतकालिके, संकेतस्थळे आदी माध्यमांद्वारे मार्गदर्शन

(संपूर्ण परिचयासाठी वाचा – ‘**www.Sanatan.org**’.)

# सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !



स्थूल देह असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।।

– जयंत बाळाजी आठवले
१८.५.१९९६

---

# पू. संदीप गजानन आळशी



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक ‘सनातन प्रभात’मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

# लघुग्रंथाची अनुक्रमणिका


卐 शिवाविषयीच्या विवेचनाचे महत्त्व ९

卐 **लघुग्रंथाचे मनोगत** १०

१. व्युत्पत्ती आणि अर्थ ११

२. काही इतर नावे ११

३. वैशिष्ट्ये १२

४. कार्य १९

५. शिवाची रूपे २०

६. मूर्तीविज्ञान २३

७. सनातन-निर्मित शिवाचे सात्त्विक ‘चित्र’ आणि ‘नामजप-पट्टी’ २५

८. शिवाची प्रसिद्ध स्थाने २९

९. उपासना ३१

## लघुग्रंथाचे मनोगत

बहुतेकांना देवाविषयी जे थोडेफार ज्ञान असते, ते बहुधा त्यांनी लहानपणी वाचलेल्या किंवा ऐकलेल्या गोष्टींमुळे असते. अशा अल्प ज्ञानामुळे त्यांचा देवावरचा विश्‍वासही थोडाफारच असतो. देवतांविषयी जास्त ज्ञान मिळाल्यास जास्त विश्‍वास निर्माण होण्यास सहाय्य होते. विश्‍वासाचे रूपांतर पुढे श्रद्धेत झाल्याने देवतेची उपासना अन् साधनाही चांगल्या प्रकारे होते. तसे व्हावे म्हणून या लघुग्रंथात शिवाविषयी इतरत्र बहुधा न दिलेले पण उपयुक्त असे अध्यात्मशास्त्रीय विवेचन करण्यावर विशेष भर दिला आहे. शिवाविषयी सविस्तर विवेचन 'शिव' या ग्रंथात केले आहे.

हा लघुग्रंथ वाचून प्रत्येकाला साधनेची स्फूर्ती मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**


वाचा सनातनचा लघुग्रंथ !

**श्रीरामरक्षास्तोत्र आणि मारुतिस्तोत्र (अर्थासह)**

